**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
Chhatrapati Sambhajinagar
431 004, Maharashtra, India
NAAC Re-accredited 'A+' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation : (0240) 2403118/2403119/2403115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
छत्रपती संभाजीनगर
४३१ ००४, महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे "अ+" दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :: शैक्षणिक विभाग ::

संदर्भ क्र.:-शैक्ष/संलग्न/२०२६-२७/ 2209-15

दिनांक :- १७-०७-२०२६

## परिपत्रक

**विषय :-** महात्मा फुले द्विजन्मशबाब्दी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित महाड सत्यागृहाच्या शताब्दी निमित्त आपण वर्षभर ''फुले आंबेडकर समता अभियान'' राबविणे बाबत. . .

**संदर्भ :-** मा. श्री. लक्ष्मीकांत देशमुख, IAS (नि), अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती यांचे पत्र.

या परिपत्रकाद्वारे मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व शैक्षणिक विभाग व संलग्नीत महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकरांचे विचार हे सत्यधर्म, विषमता निर्मूलन आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक व आर्थिक न्याय या संविधानाच्या पंचसूत्रांत सामावले आहेत, उद्याचा लोकशाहीवादी विकसित भारत घडविण्यासाठी हे विचार महाविद्यालयातील तरूण वर्गास माहिती होणे व त्यांचे प्रबोधन होणे आवश्यक आहे.

१. फुले आंबेडकर विचार तरूणांईपर्यंत नेण्यासाठी व त्यांच्या मनात विचारात रूजविण्यासाठी
२. तरूण वर्गाचे प्रबोधन करण्यासाठी काही कार्यक्रम आखले आहे.
३. महापुरूषांचे विचार तरूणांईपर्यंत नेण्यासाठी हे कार्यक्रम व आपण तसेच आपले प्राध्यापक सुचवितील ते उपक्रम राबविण्यात यावे.

सोबत जोडलेल्या निवेदनातील उपक्रम आपण विद्यार्थ्यांच्या प्रबोधन साठी राबवावे. ही विनंती.

**सोबत :-** मा. श्री. लक्ष्मीकांत देशमुख यांचे पत्र.

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

**प्रतिलिपी :**

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्वीय सहायक यांना माहितीस्तव सादर.
२. मा. प्र कुलगुरू महोदय यांचे स्वीय सहायक यांना माहितीस्तव सादर.
३. मा. विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहिती व यथायोग्य कार्यवाहीस्तव सादर.
४. प्राचार्य / संचालक, सर्व संलग्नीत महाविद्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
५. मा. अधिष्टाता सर्व विद्याशाखा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
६. संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर.
७. मा. संचालक युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक सर्व महाविद्यालयाच्या लॉगिन मध्ये उपलब्ध करून द्यावे.

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

# लक्ष्मीकांत देशमुख

IAS (नि)
अध्यक्ष भाषा सल्लागार समिती
Mobile : +919325297509
E-mail : laxmikant05@yahoo.co.in

पत्ता :
श्रीनिवास गार्डन,
बी/2, केदारनाथ
मंदिराजवळ,
मॉडेल कॉलनी,
शिवाजीनगर,
पुणे ४११०१६


---

प्रती
मा. कुलगुरू
डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर

आदरणीय महोदय
विषय : महात्मा फुले द्विजन्मशताब्दी आणि डॉ आंबेडकर प्रणित महाड सत्यागृहाच्या शताब्दी निमित्त आपल्या विद्यापीठ अंतर्गत सर्व महाविद्यालयात वर्षभर
" फुले आंबेडकर समता अभियान"
राबविणे बाबत

सर,

महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकरांचे विचार हे सत्यधर्म, विषमता निर्मूलन आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक व आर्थिक न्याय या संविधानाच्या पंचसूत्रांत सामावले आहेत. उद्याचा लोकशाहीवादी विकसित भारत घडविण्यासाठी हे विचार महाविद्यालयातीन तरुण वर्गास माहिती होणे व त्यांचे प्रबोधन होणे आवश्यक आहे.
या अनुषंगाने साने गुरुजींच्या आंतर भारती, राष्ट्र सेवा दल आणि महात्मा जोतिराव फुले समता प्रतिष्ठान या शालेय विद्यार्थी व तरुण वर्गात काम करणाऱ्या संस्थांच्या वतीने खालील प्रमाणे सविनय सादर करीत आहे. आम्ही या संस्था, आपले विद्यापीठ आणि फुले, आंबेडकर, गांधी आदी राष्ट्रीय महापुरुषाच्या नावे कार्यरत अध्यासने व राष्ट्रीय सेवा योजना सोबत काम करत फुले व आंबेडकरांचे विचार तरुणांईपर्यंत नेण्यासाठी व त्याची त्यांच्या मनात व विचारात रुजवण करण्यासाठी काही कार्यक्रम आखले आहेत, ते आपल्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करत आहे. हे कार्यक्रम व आपण तसेच आपले प्राध्यापक सुचवतील ते उपक्रम एकत्र करुन आपल्या मार्गदर्शनाप्रमाणे आपल्या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात मिळून कार्यान्वित करण्यासाठी उपरनिर्दिष्ट संस्थांचा समन्वयक म्हणून मी लक्ष्मीकांत देशमुख, माजी संमेलनध्यक्ष आपणापुढे सविनय सदर करीत आहे.
एक ) प्रत्येक महाविद्यालयात पुढील प्रमाणे "फुले आंबेडकर अभियान समता अभियान"
राबविण्याचे प्रस्तावित आहे.
अ ) 10 ते 15 जुलै 2026 दरम्यान प्रत्येक कॉलेजने वातावरण निर्मितीसाठी एक भव्य समता मार्च किंवा शोभयात्रा काढु न " फुले आंबेडकर समता अभियान " सुरु करावे . त्यात
पथनाट्य, गाणी, लेझीम, बँड ढोल आदिंचा अंतर्भाव असावा
3) प्रत्येक कॉलेजने जुलै - ऑगस्ट 2026 मध्ये एका विकएंडला ( म्हणजे शनिवार - रविवारी) 100 विदर्याथ्यांचे - त्यात निम्या मुली असतील, रंजक व Interactive पद्धतीचे समता - बंधुता शिबीर आयोजित करावे.

ब ) या शिबिरातून 11 क्रियाशील व उत्साही विदर्यार्थी निवडून त्यांची विद्यार्थी समता समिती नियुक्त करावी. त्या समितीवर दोन प्राध्यापक यांची मार्गदर्शक म्हणून निवड करावी.

क ) ही विदर्यार्थी समता समिती दर 15 दिवसाला भेटेल व चर्चा करेल.

ड ) या समितीने खालील स्टुडंट्स क्लब त्वरित स्थापित करावेत. ते तीन ते पाच विदर्यार्थ्यांचे असतील

1 ) बुक क्लब : उद्देश दर महा फुले / आंबेडकर / गांधीजींच्या पुस्तकांवर किंवा त्यांच्यावर लिहिलेल्या अन्य लेखकांच्या एका पुस्तकांवर चर्चा घडवून आणावी. त्यावेळी दोन विदर्यार्थी आपले पुस्तकावरील पेपर वाचतील. तसेच हा क्लब कवी संमेलन आणि कथा कथन कार्यक्रम पण आयोजित करेल.

2))कॉलेजच्या NSS शिबिरात फुले आंबेडकर आदिवर व्याख्याने आयोजित करावीत व ते गाव जातीमुक्त, स्त्री समता प्रदान व संविधानिक करण्यासाठी गावकऱ्यांना प्रवृत्त करावे.

3) कल्चरल क्लब : हा क्लब गाणी, नृत्य, एकांकिका, अभिवाचन असे कार्यक्रम वर्षभरात दोन तीन वेळा सदर करेल. NSS च्या शिबिरात हा ग्रुप गाणी, कविता व एकपात्री अभिनयद्वारे महापुरुषांच्या विचारांचे दर्शन घडवील

4 ) स्पोर्ट्स क्लब : याद्वारे किल्ले सर करणे, क्रीडा स्पर्धा आयोजित करणे आदी उपक्रमातून साहस, सांघिक वृत्ती आणि जात / धर्म विरहित मैत्री जोपसणे हे साधेल.

5 ) फिल्म अँड ड्रामा क्लब :

यु ट्यूब वरील व अन्य मार्गाने उत्तम दर्जेदार चित्रपट दाखवणे, त्यावर चर्चा करणे. उदा . आचार्य अत्रे( महात्मा फुले - मराठी )अनंत महादेवन (फुले - हिंदी )आणि निलेश जलमकर यांचा ' सत्यशोधक हे चित्रपट व भारत एक खोज सिरीयल मधील फुले एपिसोड तसेच डॉ आंबेडकर, गांधी व नेहरू आदिवरील चित्रपट दाखवणे, एकांकिका बसविणे आणि नाटकांचे अभिवाचन करणे या उपक्रमातून प्रबोधनासाठी कला याचा प्रत्यय आणून देणे.

6 ) डिबेट क्लब : दर पंधरा दिवसांनी संविधान, लोकशाही, समाजवाद, नागरिकांची कर्तव्ये आदी विषयावर विध्यार्थ्यानी अभ्यास करुन विषय मांडणे आणि चर्चा करणे. यातून विद्यार्थी चिकित्सक व बहुश्रुत होतील.

7 ) इतर उपक्रम :

°°°यंदा कॉलेजची सहल ही महापुरुषांच्या गावी, किल्ले, स्मारके आदी ठिकाणी आयोजित करावी. उदा. फुलेवाडा व लाल किल्ला, शनिवारवाडा, आगाखान पॅलेस ( पुणे ), रायगड, महाड, सातारा, प्रतापगड अशी एक ट्रिप एखाता येईल. आनंदवन, हेमलकसा, शोधग्राम, वर्धा अशीही service places ची ट्रिप आखता येईल. ट्रेकिंग, अभयारण्य, जंगल भ्रमण असेही करता येईल.

°°° कॉलेजच्या विद्यार्थी व प्राध्यापकांचे साहित्य संमेलन घेणे, स्नेहसंमेलनत फुले आंबेडकरांच्या जीवनावरील एकांकिका / नाटक सादर करणे भीम जलसा, कलापथक. कॉलेजचा वार्षिक अंक हा फुले, आंबेडकर केंद्रीत साहित्याचा प्रसिद्ध करणे

°°°° दर महिन्याला प्रत्येक क्लबचा एक कार्यक्रम झाला पाहिजे असे नियोजन करणे

°°°°°°°°°°°°°°°°°°°°

दोन ) विद्यापीठाने फुले विचार व समाजसुधारांच्या कामावर आणि डॉ आंबेडकरांवर दोन राष्ट्रय सेमिनार इंग्रजी मराठीत घेणे. उत्तम पेपरचे पुस्तक बनवणे. शक्य असेल तर एक परदेशात ज्या विद्यापीठशी टायअप आगे, तेथे एक आंतरराष्ट्रीय सेमिनार आयोजित करणे.

तीन ) विद्यापीठ स्तरावर फुले आंबेडकरांवार वक्तृत्व, निबंध, एकांकिका व पुस्तक परीक्षण स्पर्धा आयोजित करणे.

चार ) प्राध्यापकांना विविध ठिकाणी जाऊन व्याख्यान देणे व पॉडकास्ट करण्यासाठी उत्तेजन देणे. आम्ही ते राष्ट्र सेवा दलाच्या यु ट्यूबवर टेलिकास्ट करू.

पाच ) एक विद्यापीठस्तरीय फुले आंबेडकर विचार व कार्य केंद्रीत साहित्य कला उत्सव घेणे.

सहा ) एक क्रीडमहीत्सव घेणे.

ooooooooooooooo

सर, हे सर्व उवक्रम विद्यापीठाने राबवावेत अशी नम्र विनंती आहे. त्यासाठी आम्ही ओकता मार्गदर्शनाखाकी काम करू, ही ग्वाही देतो.

तरी या बाबत आपण एक मिटिंग एकता अध्यक्षतेखाली आयोजित करावी, तयाला आम्ही उवस्थिर राहू व मिळून कार्यक्रम ठरवू. हा आपल्या उद्यापीठचा स्वतः चा कार्यक्रम असेल, त्यात आम्ही ओकता नेतृत्व व मार्गदर्शनाखाली काम करू.

ओकता सकारात्मक प्रतिसादच्या अपेक्षेत
आपला विश्वासू
लक्ष्मीकांत देशमुख